राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.१७/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ०८/०२/२०१७

प्रति,

आयुक्त, महानगरपालिका,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार, अकोला,
वाशिम, भंडारा, गोंदिया व नागपूर),

विषय :- महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका
मतदारांकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचना...

महोदय/महोदया,

महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता यथास्थिती दि.१६ फेब्रुवारी व २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी मतदान होणार आहे. निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने मतदारांना द्यावयाच्या सूचनांचा नमुना सोबत जोडला आहे. मतदानाच्या तारखेपूर्वी सदर नमुन्याला वर्तमानपत्रात जाहिरातीच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी द्यावी व त्याचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

सोबत :- जाहिरातीचा नमुना.

D:\MNC\Election March-April 2017.docx.RSK

४२९

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## महानगरपालिका,जिल्हा परिषद/पंचायत समिती
## सार्वत्रिक निवडणुका (मतदान दिनांक १६ व २१ फेब्रुवारी, २०१७)

# मतदारांसाठी सूचना

### निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने नवीन उपाययोजना

(१) प्रत्येक उमेदवाराने खर्चाची मर्यादा ओलांडल्यास किंवा निवडणूक संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत खर्चाचा एकूण बिनचूक हिशोब सादर केला नाही तर अनर्हतेची कार्यवाही.

(२) प्रत्येक राजकीय पक्षाने निवडणूक संपल्यानंतर ६०दिवसांच्या आत खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक, नाहीतर नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही.

(३) उमेदवाराने सादर केलेल्या शपथपत्राचा गोषवारा मतदान केंद्रासमोर प्रकाशित करण्यात येईल.

(४) मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी गृहनिर्माण संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये, बँका, स्वयंसेवी संस्था, उद्योग समूह, इत्यादींची मदत व सोशल मीडियाचा मोठया प्रमाणावर वापर.

(५) मतदारांना प्रलोभने देण्यासाठी वाटण्यात येणाऱ्या रकमा, दारु व इतर वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना.

(६) आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त जबाबदार व त्यांच्या स्तरावर विशेष कक्ष.

(७) दिव्यांग व वृध्द मतदारांसाठी व्यवस्था.

### सर्व मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे.

भारत निवडणूक आयोगाने दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी प्रसिध्द केलेली मतदार यादी वापरण्यात येईल.